# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.08.2025** **वार:बुधवार**

1. राज्यात पावसाचा जोर कायम, अनेक ठिकाणी नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली
2. अतिवृष्टीमुळं अंदाजे 14 लाख एकर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान, पशुधनाचीही मोठी हानी झाली असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती
3. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत वाहतूक आणि शहरी विकासाच्या दृष्टीनं महत्त्वाचे निर्णय आणि
4. राज्यात 42 हजार 892 कोटी रुपयांचे गुंतवणूक करार

**पाऊस**

राज्यात पावसाचा जोर कायम असून, **मुंबई, ठाणे, कोकण** आणि **मराठवाड्यातल्या** काही जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई शहर आणि उपनगरांत मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळांवर पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या. ठाणे जिल्ह्यात भिवंडी, मुंब्रा भागात अनेक घरांमध्ये पाणी शिरलं, तसंच वाहतुकीलाही फटका बसला.

**नांदेड** जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात पूरग्रस्त भागात मदतकार्य वेगानं सुरू आहे. बाधित नागरिकांसाठी वैद्यकीय शिबिर आणि अन्न वितरण केंद्रं उभारली आहेत. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी पूरग्रस्त गावांना भेट देऊन मुखेड तालुक्यात पुरात बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाखांची मदत सुपूर्द केली.

**हिंगोली** जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यात पुराच्या पाण्यात अडकलेल्या 8 नागरिकांची सुटका करण्यात आली. **परभणी** आणि **सोलापूर** जिल्ह्यात 80 गावांमधल्या 41 हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांना फटका बसला आहे. **कोल्हापूर** जिल्ह्यात काही रस्ते बंद झाले असून नद्यांनी पातळी ओलांडली आहे. **सातारा** जिल्ह्यात कोयना धरणासह इतर मुख्य धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढला असून कोयना धरण जवळपास पूर्ण भरलं आहे. **सांगली** जिल्ह्यात संततधार सुरू असून वारणा आणि कृष्णा नद्या दुथडी भरून वाहात आहेत.

**यवतमाळ**च्या उमरखेड तालुक्यात पुरामुळे पळशी आणि संगम चिंचोली या गावांचा संपर्क तुटल्यामुळे इथल्या नागरिकांना बाहेर काढायचं काम सुरू आहे. **बीड** जिल्ह्यात परळी तालुक्यातल्या नागापूर धरणाचा जलायश ओसंडून वाहू लागल्यानं अनेक गावांचा पाणीप्रश्न सुटला आहे. लातूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा धरणाचे दोन दरवाजे काल रात्री बंद करण्यात आले आहेत.

**खडकवास**ला धरणातून आज सकाळी नऊ वाजता 38 हजार क्युसेक्स या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येणार आहे. यामुळे पुणे शहरातून वाहणाऱ्या मुठा नदीकाठच्या वस्तीत पाणी शिरण्याची शक्यता असल्यानं नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन पुणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे प्रमुख गणेश सोनुने यांनी केलं आहे. सिंहगड रस्त्यावरील एकता नगरीतील द्वारका, जलपूजन, शारदा सरोवर या तीन सोसायटींमध्ये पाणी शिरलं असून तिथल्या नागरिकांना रात्री बाहेर काढून स्थलांतरित करण्यात आलं आहे.

**मुंबई**त काल संध्याकाळी बंद पडलेल्या मोनोरेलमधून प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी चार तास बचावकार्य सुरू होतं, त्यातून 500 हून अधिक प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं. म्हैसूर कॉलनी आणि भक्ती पार्क स्थानकांदरम्यान अडकलेल्या मोनोरेल ट्रेनमध्ये वीज आणि वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्यानं काही प्रवाशांचा श्वास गुदमरला. त्यापैकी 14 जणांना घटनास्थळी उपचारानंतर घरी सोडण्यात आलं, तर एका मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आणि तिची प्रकृती स्थिर आहे. या घटनेची चौकशी केली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**रायगड** जिल्ह्यात शाळा आणि महाविद्यालयं आज बंद राहणार आहेत. **रत्नागिरी** जिल्ह्यात आजही शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. रात्री नऊच्या स्थितीनुसार, खेडमधली जगबुडी नदी अद्याप धोका पातळीच्या वरूनच वाहत आहे. चिपळूणची वाशिष्ठी, राजापुरातल्या कोदवली आणि अर्जुना, तसंच संगमेश्वरमधली बावनदी या नद्या इशारापातळीच्या वरूनच वाहत आहेत. चिपळूणमध्ये 31 कुटुंबांतल्या 76 लोकांना स्थलांतरित करण्यात आलं.. संगमेश्वरमधली भातशेती मोठ्या प्रमाणावर पाण्याखाली गेली आहे.

**पुणे** मुंबई दरम्यानच्या अनेक रेल्वे गाडया आज रद्द करण्यात आल्या आहेत. मध्य रेल्वेने ही माहिती दिली आहे. समृद्धी महामार्गावरील शहापूर जवळील खुटघर पथकर नाक्यावळ काल मोठी दरड कोसळल्यामुळं सुमारे दोन तास वाहतूक ठप्प झाली होती.

राज्यात होत असलेल्या पावसाबद्दल, भारतीय हवामान शास्त्र विभागाचे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी आकाशवाणीशी बोलताना अधिक माहिती दिली...

**मध्य बंगालचा उपसागर व लगतच्या परिसरात तयार झालेलं कमी दाबाचं क्षेत्र आता अजून तीव्र झालं असून ते पश्चिम मध्य बंगालचा उपसागर व लगतच्या उत्तर आंध्र व दक्षिण ओडिशा किनारपट्टीवर स्थित आहे, आणि ते उत्तर-पश्चिम दिशेने सरकण्याची शक्याता आहे. त्यामुळे मान्सूनचे वारे सक्रिय झाले असून महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी चांगल्या प्रकारे पाऊस पडताना आपल्याला दिसत आहे तर येणारे चोवीस तास हे हवामानाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे असणार आहे विशेष करून मुंबई कोकण किनारपट्टी आणि मध्य महाराष्ट्रातील घाट एरियाजसाठी.**

**मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री-अतिवृष्टी**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अंदाजे 14 लाख एकर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं असून पशुधनाचीही मोठी हानी झाली असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मंत्रिमंडळ बैठकीनंतर ते काल माध्यमांशी बोलत होते. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले असल्याचं त्यांनी सांगितलं. स्थानिक पातळीवर जीवित किंवा मालमत्तेची हानी झाली असेल, तिथे जिल्हाधिकाऱ्यांना सर्व अधिकार दिल्याचं ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबई आणि ठाण्याच्या पूरपरिस्थितीचा आढावा घेतला तसंच मिठी नदी आणि विक्रोळीतल्या दरडप्रवण परिसराची पाहणी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात पाऊस आणि पूर परिस्थितीचा आढावा घेतला.

**मंत्रिमंडळ निर्णय**

राज्यातील वाहतूक आणि शहरी विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे अनेक निर्णय काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आले. पुणे-लोणावळा या उपनगरीय रेल्वे मार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिका उभारणीला मान्यता देण्यात आली आहे. याचबरोबर पुणे मेट्रोच्या बालाजीनगर–बिबवेवाडी आणि स्वारगेट-कात्रज या दोन नवीन स्थानकांना मंजुरी मिळाली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

एमयूटीपी अंतर्गत मुंबईसाठी नवीन 268 वातानुकूलित रेल्वे गाड्यांची खरेदी करण्याला तसंच ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान उन्नत मार्गिकेला मंजूरी देण्यात आली. तसंच मेट्रो मार्गिका 11 या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासह नागपुरात एक नवनगर तयार करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. तांत्रिक कारणामुळे बंद असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या चिपी विमानतळाची सेवा पूर्ववत करण्यालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**<u>सौरऊर्जा-सामंजस्य करार- स्वाक्षरी</u>**

सौरऊर्जा आणि विदा क्षेत्रातल्या 10 सामंजस्य करारांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मंत्रालयात स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या सामंजस्य करारांमुळे राज्यात 42 हजार 892 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून 25 हजार 892 रोजगारांची निर्मिती होणार असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली. विविध गुंतवणुकींसाठी महत्त्वपूर्ण असे आठ सामंजस्य करार आणि दोन धोरणात्मक करार यावेळी करण्यात आले. गुंतवणूकदारांनी अतिशय ठाम आणि सकारात्मक बांधिलकी दाखवली असून यामुळे संपूर्ण देशात आमूलाग्र बदल घडवणार असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<u>मुख्यमंत्री-अतिरिक्त रेलगाड्या</u>**

कोकणात तसंच अन्यत्र जाणाऱ्या गणेशभक्तांच्या सोयीसाठी दरवर्षीपेक्षा 367 रेल्वेच्या फेऱ्यांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर माध्यमांना दिली. आगामी गणेशोत्सवात गणेशभक्तांच्या सुविधेसाठी, राज्यशासनानं रेल्वेमंत्री आणि भारतीय रेल्वेला जादा गाड्या सोडण्याची मागणी केली होती. या मागणीला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचं ते म्हणाले.

**<u>गणेशोत्सव-बोधचिन्ह</u>**

यंदा पासून राज्यमहोत्सव म्हणून साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या बोधचिन्हाचं अनावरण काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत झालं. उत्सवातल्या कार्यक्रमांसाठी सुमारे 11 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. भारतीय सैन्य दलाच्या ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी स्वदेशीचा जागर हे दोन विषय या निमित्ताने राज्यमहोत्सवाशी जोडण्यात येणार आहेत.

**<u>बी सुदर्शन रेड्डी</u>**

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इंडी आघाडीच्या सर्व घटकपक्षांनी एकमताने रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली.

**<u>VVPAT-सपकाळ</u>**

काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळानं काल, राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरण्याची मागणी केली. या निवडणूकीत व्हीव्हीपॅट वापरणार नाही अशी भूमिका निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. निवडणूक निष्पक्ष आणि पारदर्शक पार पाडणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. मात्र निवडणूक आयोगाचा सध्याचा कारभार पहाता त्यांच्यावरचा विश्वास डळमळीत झाला आहे असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं. यावेळी सपकाळ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<u>जवान अंत्यसंस्कार-कोल्हापूर</u>**

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातल्या मिसाळवाडी इथले जवान साताप्पा मिसाळ यांच्या पार्थिव देहावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मिसाळ हे भारतीय सैन्य दलात फिरोजपुर पंजाब आर्टलरी रेजिमेंटमध्ये हवालदार पदावर कार्यरत होते. रविवारी 17 ऑगस्टला सेवेत असताना विजेच्या धक्क्याने त्यांचा मृत्यू झाला.

**<u>पोतदार अंत्यसंस्कार</u>**

ज्येष्ठ अभिनेते अच्युत पोतदार यांच्या पार्थिवावर काल रात्री ठाण्यातल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पोतदार यांचं परवा रात्री ठाण्यातल्या खाजगी रुग्णालयात निधन झालं. ते 91 वर्षांचे होते. मध्यप्रदेशातल्या रेवा इथं प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर ते लष्करात भरती झाले, आणि कॅप्टन म्हणून 1967 मधे निवृत्त झाले. त्यानंतर अभिनयाचा छंद जोपासत मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका, आणि चित्रपटांमधे विविध चरित्र भूमिकांमधे त्यांनी ठसा उमटवला.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्रात घाट माथ्यांवर तुरळक ठिकाणी तसंच विदर्भात वीजांसह अतिवृष्टिचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**